# निशाणी क्रमांक ५ खालील आदेश

मौजे खंडाळा, ता. वैजापूर, जि. औरंगाबाद येथील गट क्रमांक ४३१ एकुण क्षेत्र ७७ एकर या जमीनीचे मुळ मालक प्रतापसिंग हंसराजसिंग चव्हाण होते. त्यांनी बऱ्याच इसमांशी करारनामे करुन सदर मिळकत विक्री केली होती. त्यापैकी ५ एकर ३७ गुंठे क्षेत्र वादीस व ४ एकर क्षेत्र प्रतिवादी क्र. ३ जलीलखाँ अब्बासखाँ पठाण व प्रतिवादी क्र. ४ आशपाक अमीर पठाण यांच्याशी दिनांक २९/०३/२००० रोजी एकाच इसार पावतीच्या अधारे विक्रीचा इसार केला. (सदरची मिळकत ही प्रस्तुत अर्जाचा विषय असुन त्यास यापुढे वादमिळकत असे संबोधण्यात आले आहे.)

२. वादमिळकतीवर वादी यांचा इसार पावती केली त्या तारखेपासुनच ताबा आहे. त्यानंतर दिनांक २६/०७/२००६ रोजी जमीनीचे मुळ मालक प्रतापसिंग हे वयोमानाने मयत झाले. असे की, दिनांक ०४/०३/२०१५ रोजी इसार पावतीच्या अनुषंगाने वादी व प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी मयत प्रतापसिंग यांचा मुलगा नामे चंद्रमोहनसिंग प्रतिवादी क्र. १ याला प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी रक्कम रुपये ३५,०००/– (पसत्तीस हजार) व वादीने रक्कम रुपये ३०,०००/– (तीस हजार) दिले. प्रतिवादी क्र. १ यांनी त्यानुसार वादी व प्रतिवादी क्र. ३ व ४ यांच्या हक्कात भरणा पावती करुन दिली.

३. वादी यांनी सदर इसार पावती व भरणा पावतीच्या आधारे दिनांक ०७/०८/२०१५ रोजी तहसीलदार वैजापूर यांच्याकडे ७/१२ सदरी त्यांचे

नावाची पिक पेरेपत्रकात नोंद घेण्यात यावी या करीता अर्ज दिला. त्यावर तहसीलदार यांनी तलाठी व मंडळ अधिकारी यांना दिनांक १६/१०/२०१५ रोजी ७/१२ उतार्‍यावर पिक पेरेच्या रकान्यात नोंद घेण्यातबाबत आदेश दिले. त्यानुसार तलाठी सज्जा खंडाळा यांनी दिनांक १६/११/२०१५ रोजी पंचनामा केला व त्यानुसार वादी व प्रतिवादी क्र. ३ व ४ यांच्या नावाची नोंद पिक पेरेला घेण्यात आली. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी संगनमत करुन दिनांक २९/०३/२००० रोजी वादी यांना इसार पावतीने दिलेले क्षेत्र बाबात पुन्हा प्रतिवादी क्र. ५ लैलाबी हिच्या नावे इसार पावती करुन दिली.

४. वादी यांनी दिनांक ०९/०४/२०१९ रोजी वकील जावेद बेग यांच्यामार्फत प्रतिवादी क्र. १ यांना इसार पावतीच्या आधारे खरेदी खत करुन दयावे अशी नोटीस पाठविली. परंतु प्रतिवादी क्र. १ यांनी ती नोटीस घेण्यास नकार दिला. त्यानंतर दिनांक १४/०६/२०१९ रोजी प्रतिवादी व त्यांच्या नातेवाईकांनी वादी यांच्या वाद मिळकतीत येवुन वादी व त्यांचा मुलगा रमीज व पत्नी यांना बेदम मारहाण करुन त्यांच्या वहितीस हिल्ला हरकत केली. म्हणुन वादीने प्रतिवादींविरुध्द तुर्तात मनाई हुकूमाची या अर्जाद्वारे मागणी केली आहे.

५. प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांची लेखी कैफीयत व जबाब निशाणी क्र. ३५, प्रतिवादी क्र. २ हिने तीची लेखी कैफीयत व जबाब निशाणी क्र. ३१ तसेच प्रतिवादी क्र. ३, ४ व ५ यांनी त्यांची लेखी कैफीयत व जबाब निशाणी क्र. २२ वर दाखल केली असून वादीचे सर्व कथने अमान्य केली आहेत. पुढे त्यांचे सर्वांचे असे म्हणणे आहे की, वादमिळकत ही गट क्र. ४३१ एकुण क्षेत्र ३० हेक्टर ३५ आर पैकी

५ एकर (२ हेक्टर ) क्षेत्राचे मुळ मालक प्रतापसिंग हंसराजसिंग चव्हाण होते. प्रतापसिंग यांनी त्यांच्या हयातीत त्यांची सुन प्रतिवादी क्र. २ जयश्रीदेवी चंद्रमोहनसिंग चव्हाण हिला दिनांक ०१/०३/१९९८ रोजी वाटणी पत्राद्वारे सदर क्षेत्र कायम स्वरुपी वाटुन दिले आहे. तेव्हा पासून प्रतिवादी क्र. २ हिचा सदर क्षेत्रावर ताबा आहे. सदर वाटणी पत्राच्या आधारे प्रतिवादी क्र. २ हिने दिनांक २९/०३/२००० रोजी प्रतिवादी क्र. ३ व ५ यांच्या बरोबर करारनामा केला. त्याच वेळेस प्रतिवादी क्र. १ च्या नावे प्रतापसिंग यांनी करुन ठेवलेले मृत्यु पत्राच्या अधारे उर्वरीत ५ एकर ३७ गुंठे क्षेत्र देखील त्यांनी प्रतिवादी क्र. ३ व प्रतिवादी क्र. ४ यांना विक्री करण्याचा करारनामा केला.

६. त्यानंतर दिनांक ०२/०७/२०१९ रोजी प्रतिवादी क्र. २ हिने करारनाम्यानुसार प्रतिवादी क्र. ३ व ५ यांच्या हक्कात नोंदणीकृत खरेदीखत क्र. ३०७०/२०१९ करुन दिले. तसेच प्रतिवादी क्र. १ याने दिनांक ११/१०/२०१९ रोजी प्रतिवादी क्र. ३ व ४ यांच्या लाभात नोंदणीकृत खरेदीखत क्र. ३९९४/२०१९ अन्वये करुन दिले. त्यानुसार फेर होवुन त्याबाबत ७/१२ उताऱ्याला प्रतिवादींची नावे देखील लागलेली आहेत.

७. पुढे प्रतिवादी क्र. ३ जलीलखाँ याचे असे म्हणणे आहे की, त्याने नोंदणीकृत खरेदीखत क्र. ३०७०/२०१९ नुसार खरेदी केलेले ३ एकर क्षेत्र पुढे अन्सारखाँ सांडुखाँ पठाण यांना विक्री करण्याचा करारनामा रक्कम

रुपये २७,००,०००/– (सत्तावीस लाख रुपये) मध्ये करुन त्याबाबतची इसार पावती अन्सारखाँ यास करुन दिलेली आहे. त्यापैकी रक्कम रुपये २५,००,०००/– (पंचवीस लाख रुपये) प्रतिवादी क्र. ३ याला रोख मिळालेली असून उर्वरीत रक्कम रुपये २,००,०००/– (दोन लाख रुपये) खरेदीच्या वेळेस घेवून प्रतिवादी क्र. ३ अन्सारखाँच्या हक्कात खरेदीखत करुन देणार नाही. परंतु वादीने सदर अन्सारखाँ यास दाव्यात पक्षकार केलेले नाही. तरी वादी याचा सदर मिळकतीशी कोणताही संबंध नसून वाद मिळकत वादीच्या ताब्यात नाही. केवळ पैसे उकळण्यासाठी वादीने सदरचा खोटा दावा व अर्ज दाखल केला आहे. तरी सदरचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली आहे.

८. तुर्तातूर्त मनाई हुकूमाचा अर्ज सिध्द करण्याकरीता वादींनी खालील मुद्दे सिध्द करणे आवश्यक आहे.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी दावा वादींच्या लाभात आहे काय ? | .. होय. |
| २. | दाव्याचा समतोल वादींच्या बाजुने आहे काय ? | .. होय. |
| ३. | तुर्तातूर्त मनाई हुकूम न दिल्यास वादीचे नुकसान होईल का ? | .. होय. |
| ४. | आदेश काय ? | अर्ज मंजुर करण्यात आला. |

## कारणेमिमांसा

९.        वादीने सदर अर्जाच्या पुष्ठार्थ खालील कागदपत्रे दाखल केले आहेतः– दिनांक २९/०३/२००० रोजीची इसार पावती / करारनाम्याची झेरॉक्स प्रत, दिनांक ०४/०३/२०१५ रोजीच्या भरणा पावतीची झेरॉक्स प्रत, गट क्र. ४३१ च्या ७/१२ उताऱ्याची झेरॉक्स प्रत, दिनांक ०९/०४/२०१९ रोजी खरेदीखत करुन मिळणेबाबत पाठविलेली कायदेशीर नोटीसची झेरॉक्स प्रत, सदर नोटीस घेत नसल्यास नोटीस परत आल्याचे पाटीक, उपविभागीय अधिकारी वैजापूर यांच्या न्यायालयात दाखल केलेल्या अपीलाची साक्षांकीत प्रत, पोलीस स्टेशन वैजापूर येथे दिनांक १५/०६/२०१९ रोजी दिलेली तक्रारीबाबत प्रथम खबरी अहवालाची साक्षांकीत प्रत, नियमीत दिवाणी दावा क्र. ४४/२०१४ मधील प्रतिवादी क्र. १ यांनी दिलेला लेखी जबाबाची साक्षांकीत प्रत दाखल केली आहे.

१०.        प्रतिवादी क्र. २ हिने तिच्या जबाबाच्या पुष्ठर्थ दिनांक ०१/०३/१९९८ रोजीचे वाटणी पत्राची नोटरीमार्फत केलेली सत्य प्रत, गट क्र. ४३१ चा ८–अ चा उतारा तसेच दिनांक ०२/०७/२०१९ रोजीचे नोंदणीकृत खरेदीखत क्र. ३०७०/२०१९ ची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे.

**मुद्दे क्रमांक १ ते ३ करीताः**

११.        वादी करीता वकील श्री. एस. आर. जाधव यांनी त्यांचा लेखी युक्तीवाद निशाणी क्र. ३८ वर दाखल केला आहे. तसेच प्रतिवादी क्र. १ याने निशाणी क्र. ४७, प्रतिवादी क्र. २ हिने निशाणी क्र. ४८ व प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांनी निशाणी क्र. ४९

वर लेखी युक्तीवाद दाखल केलेला आहे. वादी व प्रतिवादी यांची कथने वाचली तसेच त्यांनी दाखल केलेले लेखी युक्तीवाद देखील वाचले. वादी यांचे असे म्हणणे आहे की, त्यांनी मयत प्रतापसिंग चव्हाण कडून इसार पावतीच्या आधारे मौजे खंडाळा येथील गट क्र. ४३१ मधील ५ एकर ३७ गुंठे क्षेत्र विकत घेतले होते व तेव्हा पासून वादीची सदर मिळकतीवर कब्जेवहीवाट आहे. प्रतिवादी क्र. १ चंद्रमोहनसिंग व त्याचा भाऊ प्रलयसिंग यांच्यामध्ये नियमीत दिवाणी दावा नंबर ४४/२०१४ हा प्रलंबित आहे व सदर दाव्याच्या कैफीयतीमधील परिच्छेद क्र. ७ मध्ये प्रतिवादी क्र. १ हयाने वाद मिळकत ही दिनांक २९/०३/२००० रोजीच्या इसार पावती आधारे वादी यांना दिल्याचे व त्याबदल्यात रक्कम रुपये १,३५०००/– (एक लाख पसत्तीस हजार) घेतल्याचे कबुल केले आहे. असे असतांना दिनांक १४/०६/२०१९ रोजी प्रतिवादी यांनी वादी व त्यांच्या कुटूंबियांना बेदम मारहाण केली त्याबाबत वादी यांनी प्रथम खबरी अहवाल क्र. १९४/२०१९ अन्वये पोलीस स्टेशन वैजापूर येथे तक्रार दिली होती.

१२. तसेच प्रतिवादी यांनी दिनांक २९/०३/२००० रोजी प्रतिवादी क्र. ३ व ५ यांच्या हक्कात खोटा इसार पावतीचा दस्त बनवल्यामुळे वादी यांनी त्यांच्या विरोधात वैजापूर येथील प्रथम वर्ग न्यायालयात नियमीत फौजदारी प्रकरण क्र. २१५/२०१९ भारतीय दंड संहिता कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ व १२०–ब अन्वये दाखल केले असून सदरचे प्रकरण प्रलंबित आहे. प्रतिवादी हे संगनमत करुन वादी यास वाद मिळकतीतून बेदखल करण्याच्या प्रयत्नात आहेत. असे झाल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. तरी प्रतिवादी यांनी वादीच्या ताब्यात असलेल्या क्षेत्रास हरकत अडथळा करु नये अशी तुर्तातुर्त मनाई हुकूमाची मागणी मंजुर व्हावी अशी विनंती केली आहे.

१३. प्रतिवादी क्र. १ तर्फे युक्तीवाद करण्यात आला की, प्रतिवादी क्र. १ चे वडील यांनी त्यांच्या हयातीत अनेक विक्रीचे व्यवहार करुन ठेवलेले आहेत. तसेच त्यांनी मृत्यु पत्र, वाटणी पत्र व इत्यादी मार्गाने जमीनींचे हस्तांतर केलेले आहे. वादी याने वाद मिळकतीच्या चतुःसिमा दिलेल्या आहे त्या प्रतिवादी क्र. २ हिला वाटणी पत्रा आधारे मुळ मालक प्रतापसिंग यांनी दिलेल्या ५ एकर क्षेत्राच्या चतुःसिमा आहे. परंतु वादीने सदर चतुःसिमाच्या आतील क्षेत्रास म्हणून ५ एकर ३७ गुंठे क्षेत्रात दाखवलेले असून ते चुकीचे आहे. सदर चतुःसिमा मधील ५ एकर क्षेत्राशी प्रतिवादी क्र. १ याचा काहीही संबंध नाही. सदर मिळकत ही प्रतिवादी क्र. २ हिची (absolute property) पुर्ण मालक म्हणून अबाधित संपत्ती आहे. त्यामुळे त्याबाबतचे व्यवहार करण्याचे तिला एकटीलाच अधिकार आहे. सदर अधिकाराने तीने प्रतिवादी क्र. ३ व ५ यांना ५ एकर जमीन दिनांक २९/०३/२००० रोजीच्या इसार पावतीने विक्री करण्याचा करार केला होता. त्यानंतर दिनांक ०२/०७/२०१९ रोजी खरेदीखत दस्त क्र. ३०७०/२०१९ अन्वये विक्री करुन दिलेली आहे. सदर मिळकतीशी वादीचा कोणताही संबंध नसून त्यावर वादीचा कब्जा देखील नाही. करीता वादीचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

१४. प्रतिवादी क्र. २ तर्फे युक्तीवाद करण्यात आला की, दिनांक २९/०३/२००० इसार पावतीचे आधारे करण्यात आलेला सदरचा दावा हा मुदतीत नाही. तसेच सदरची इसार पावती ही नोंदणीकृत नाही. प्रकरणात सदर इसार पावतीची झेरॉक्स प्रत दाखल केलेली आहे व सदर इसार पावतीचा स्टॅम्प नंबर व प्रतिवादी क्र. २ हिने प्रतिवादी क्र. ३ व ५ यांना करुन दिलेल्या इसार पावतीचा स्टॅम्पे नंबर एकच आहे

यावरुन वादीकडे असलेली इसार पावती ही बनावट असल्याचे दिसून येते. सदर मिळकत ही प्रतिवादी क्र. २ हिच्या नावे असून तिच्या कब्ज्यात होती. ती तिची पुर्ण मालकीची मिळकत असून तीने सदर मिळकत प्रतिवादी क्र. ३ व ५ यांना विक्री केलेली आहे. तसेच सदर मिळकतीचा ताबा देखील प्रतिवादी क्र. ३ व ५ यांना दिलेला आहे. प्रतिवादी क्र. २ हिच्या मालकीच्या ५ एकर क्षेत्राशी वादीचा कोणताही संबंध नसून ती वादीच्या ताब्यात नाही. करीता वादी तुर्तातुर्त मनाई हुकूमाचे आदेश मिळण्यास पात्र नाही. करीता वादीचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

१५.    प्रतिवादी क्र. ३ ते ५ तर्फे युक्तीवाद करण्यात आला की, प्रतिवादी क्र. २ हिने प्रतिवादी क्र. १ विरुध्द नियमीत दिवाणी दावा क्र. १४२/२०१९ दाखल केला होता त्यामध्ये तडजोड होवून प्रतिवादी क्र. २ हिची मालकी व कब्जेवहीवाट ५ एकर जमीनीस जाहीर केल्याने त्याबाबत फेरफार क्र. ११८० मंजुर करण्यात आला. त्यानंतर प्रतिवादी क्र. २ हिचे नाव ७/१२ उताऱ्याला देखील नोंदविण्यात आले. त्यानंतर प्रतिवादी क्र. २ हिने सदर ५ एकर क्षेत्र प्रतिवादी क्र. ३ व ५ यांच्या हक्कात खरेदीखत क्र. ३०७०/२०१९ अन्वये करुन दिले. प्रतिवादी क्र. ३ व ५ यांनी सदर मिळकत प्रतिवादी क्र. २ हिला मोबदला देवून खरेदी केली असून ते बोनाफाईड पर्चेसर आहेत. वादी यांचे वाद मिळकतीशी कोणताही संबंध नसून त्यांचा त्यावर ताबा नाही. करीता अर्ज नामंजुर झाल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट अर्ज मंजुर झाल्यास प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांचे नुकसान हाईल.

१६. प्रकरणात दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, दिनांक २९/०३/२००० रोजी गट क्र. ४३१ चे मुळ मालक प्रतापसिंग यांनी वादी व प्रतिवादी क्र. ३ व ४ यांच्या लाभात इसार पावती / करारनामा करुन दिला होता. सदर इसार पावतीनुसार वादी यास प्रतापसिंग यांनी ५ एकर ३७ गुंठे क्षेत्र विक्री केले होते, ज्याच्या चतुःसिमा खालीलप्रमाणे :-

पुर्वेस : (अत्तरशेट पंजाबी), किशोर पंजाबी, बकाजी उशीर, जनार्दन उशीर.

पश्चीमेस : रियाजखाँ, अजीजखाॅ, सईदखाँ पठाण यांच्या गटातील कब्जात असलेले माझे क्षेत्र व छब्बु बाबुराव जाधव यांना मी विक्री केलेले याच गटातील क्षेत्र.

दक्षिणेस : साहेबराव बंडु पवार व देवराव बंडु पवार (सध्या वसंत देवराव पवार व विकास साहेबराव पवार) यांचे बेकायदेशीर कब्ज्यात असलेले याच गटातील माझे क्षेत्र.

उत्तरेस : लिहुन घेणार पार्टी क्र. १ व २ (जलील व अश्पाक) यांचे याच गटातील सदर इसार पावती आधारे विक्री करारनामा केलेले ४ एकर क्षेत्र.

१७. तसेच प्रतिवादी क्र. २ व प्रतापसिंग यांनी केलेली दिनांक २९/०३/२००० रोजीची इसार पावती पाहिली असता सदर इसार पावतीत ज्या स्टॅम्प पेपरवर लिहिलेली आहे त्याचा क्रमांक व वादीचे लाभात केलेल्या इसार पावतीचा स्टॅम्प पेपर क्रमांक एकच असल्याचे दिसून येते. वादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी यांनी सदरचा खोटा दस्त केला असून त्याबाबत त्याने वैजापूर येथील प्रथम वर्ग न्यायालयात नियमीत फौजदारी खटला क्र. २१५/२०१९ भारतीय दंड संहिता कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ व १२०-ब अन्वये दाखल केले असून

सदरचे प्रकरण प्रलंबीत आहे. सदर दस्ताबाबत फौजदारी खटला प्रलंबीत असल्याने त्याबाबत आजरोजी भाष्य करणे योग्य ठरणार नाही. परंतु यावरुन असे दिसून येते की, दोन्ही दस्तांपैकी एक दस्त हा बनावट आहे. यापैकी कोणता दस्त खरा आहे हे वादी व प्रतिवादी यांना पुराव्यानीशी सिध्द करावे लागेल.

१८. प्रतिवादी क्र. १ तर्फे युक्तीवाद करण्यात आला की, वाद मिळकत ही प्रतिवादी क्र. २ हिने प्रतिवादी क्र. ३ व ५ यांच्या लाभात दिनांक २९/०३/२००० रोजीच्या इसार पावती / करारनाम्याने करुन दिली होती. परंतु वादीने दाखल केलेली नियमीत दिवाणी दावा क्र. ४४/२०१४ मधील कैफीयत (निशाणी क्र. १५) चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. १ चंद्रमोहनसिंग हा उपरोक्त दाव्यातील देखील प्रतिवादी आहे. सदर कैफीयतीतील परिच्छेद क्र. ७ मध्ये प्रतिवादी क्र. १ याने स्पष्ट उल्लेख केलेला आहे की, प्रतापसिंग यांनी दिनांक २९/०३/२००० रोजी करारनामा (इसार पावती) आधारे जलीलखाँ अब्बासखाँ पठाण, अश्पाक अमीरखाँ पठाण व इकबाल शेख मुनीर (वादी) यांचे हक्कात रक्कम रुपये १७,३५,०००/–(सतरा लाख पसतीस हजार) मध्ये करुन दिलेला आहे. त्यापैकी रक्कम रुपये १,३५०००/– (एक लाख पसतीस हजार) रोख घेतलेले आहेत. पुढे प्रतिवादी क्र. १ याने त्या कैफीयतीमध्ये स्पष्ट नमुद केले आहे की, सदर मिळकत ही सदर इसमाच्या ताब्यात इसार पावती होण्याअगोदर बटाईने दिलेली होती व त्यानंतर तो ताबा कायम ठेवण्यात आलेला आहे. प्रतिवादी क्र. १ याने प्रस्तुत दाव्यात दिलेली कैफीयत व यापुर्वी दाखल असलेल्या नियमीत दिवाणी दावा क्र. ४४/२०१४ मधील कैफीयतीतील दिनांक २९/०३/२००० रोजीच्या करारनाम्याबाबत तफावत दिसून येते.

१९. भारतीय पुरावा कायदयाच्या कलम ११५ च्या तरतुदीनुसार (प्रतिष्टंभ–प्रतिबंध) estoppel – जेव्हा एखादी व्यकती स्वतःचे अधिकथन, कृती किंवा अकृती याद्वारे एखादी गोष्ट खरी आहे असा दुसऱ्या व्यक्तीचा समज व्हावा व तीने तसे समजुन वागावे अशी तरतुद आहे. नियमीत दिवाणी दावा क्र. ४४/२०१४ हा दावा पुर्वीचा असून त्यातील कैफीयत अगोदर दाखल केली आहे. त्यामुळे सदर कलमानुसार प्रतिवादी क्र. १ च्या कैफीयतीस भारतीय पुरावा कायदयाच्या कलम ११५ च्या तरतुदीची बाधा येते (doctrine of estoppel). त्यामुळे पुर्वी नियमीत दिवाणी दावा क्र. ४४/२०१४ यामध्ये घेतलेला बचाव आता प्रतिवादी क्र. १ हा उलटुन लावू शकत नाही.

२०. वादीने दाखल केलेला सन २०१५–२०१६ च्या ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये पिक पेऱ्याच्या रकान्यात इकबाल शेख (वादी) याच्या नावाची नोंद दिसून येते. तसेच प्रतिवादी क्र. १ हयाने नियमीत दिवाणी दावा क्र. ४४/२०१४ मधील कैफीयतीमध्ये स्वतःच वादीचा वाद मिळकतीवरील ताबा असल्याचे मान्य केलेले आहे. तरी वाद मिळकत वादीच्या ताब्यात असल्याचे दिसून येते. वादीच्या म्हणण्यानुसार दाव्यासकारण दिनांक १४/०६/२०१९ रोजी ज्यावेळी प्रतिवादी यांनी वादी व त्याच्या पत्नी व मुलाला बेदम मारहाण करुन वाद मिळकत कसन्यापाससुन हरकत अडथळा निर्माण केला त्यावेळी घडला. सदरबाबीच्या पुष्ठर्थ वादीने प्रकरणात प्रथम खबरी अहवाल क्र. १४९/२०१९ ची प्रत दाखल केलेली आहे. सदर अहवालाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीची पत्नी बानोबी हिने

दिनांक १५/०६/२०१९ रोजी घाटी दवाखान्यात असतांना पोलीसांनी तिचा फिर्यादी जबाब लिहून सदरचा प्रथम खबरी अहवाल नोंदविलेला आहे. यामध्ये बानोबी हिने तक्रार दिली होती की, दिनांक १४/०६/२०१९ रोजी ती तीचे पती व मुलगा रमिज हे खंडाळा येथील गट क्र. ४३१ मध्ये दिनांक १४/०६/२०१९ रोजी दुपारी ३.३० च्या सुमारास वखर हाकत असतांना प्रतिवादी क्र. ५ लैलाबी व तिच्या घरच्यांनी त्यांना शिवीगाळ केली व शेतात काम करण्यास अडथळा निर्माण केला. तिचा मुलगा रमिज समजविण्यास गेला असता त्याला लोखंडी गजाने त्याच्या डाव्या हाताला मारुन हात फ्रॅक्चर केला. तिचे पती भांडण सोडविण्यास गेले असता लाकडी दांडयाने त्यांच्या डोक्यात मारुन डोके फोडले. तिला लाथाने व चापटाने मारहाण केली. म्हणुन त्यांनी सदरची फिर्याद दिली. सदर फिर्यादीबाबत पुढे काय झाले याबाबत न्यायालयासमोर काहीही दाखल केलेले नाही. परंतु यावरुन असे दिसून येते की, दिनांक १४/०६/२०१९ रोजी प्रतिवादी क्र. ५ ने वादीस वाद मिळकतीत काम करण्यास हरकत अडथळा निर्माण करुन मारहाण केली.

२१. प्रकरणात दाखल इतर कागदोपत्र जसे प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. ३ व ४ यांच्या लाभात करुन दिलेले खरेदीखत तसेच प्रतिवादी क्र. २ हिने प्रतिवादी क्र. ३ व ५ यांच्या लाभात करुन दिलेले खरेदीखत हे सर्व सन २०१९ चे आहेत. म्हणजेच नियमीत दिवाणी दावा क्र. ४४/२०१४ चे कैफीयत दिल्यानंतरचे त्यामुळे सदर दस्तांबाबत संशय निर्माण होतो. सदरचे दस्त हे खरे व कायदेशीर आहे किंवा कसे हे पुराव्याअंती सिध्द होईल. आजरोजी त्यावर भाष्य करणे योग्य ठरणार नाही.

२२. उपरोक्त नमुद केलेल्या कारणावरुन तसेच वादीने दाखल केलेला पंचनामा ७/१२ उतारा व नियमीत दिवाणी दावा क्र. ४४/२०१४ ची कैफीयती वरुन असे निर्दशनास येते की, गट क्रमांक ४३१ मौजे खंडाळा, ता. वैजापुर, क्षेत्र ५ एकर ३७ गुंठे ही मिळकत वादीच्या ताब्यात असून दिनांक १४/०६/२०१९ रोजी प्रतिवादी क्र. ५ लैलाबी व तिच्या नातेवाईकांनी वादीच्या ताब्यास हरकत अडथळा केला असल्याने वादीच्या लाभात प्रथम दर्शनी दावा आहे. याउलट वाद मिळकत प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांच्या ताब्यात असल्याचे दाखविण्याकरिता त्यांनी कोणतेही कागदपत्र प्रकरणात दाखल केलेले नाही. पुढे प्रतिवादी क्र. ३ याने ३ एकर मिळकतीबाबत अन्सारखाँ सांडुखाँ पठाण यास करारनामा करुन दिल्याचे त्याने स्वतः सांगितले आहे. अशा परिस्थितीत वाद मिळकती संदर्भात गुंता वाढत असल्याचे दिसून येते व वादीचा अर्ज नामंजुर केल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसार होईल. सबब, सदरचा अर्ज मंजुर करुन मुद्दे क्रमांक १ ते ३ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवुन मुद्दा क्रमांक ४ करीता खालील प्रमाणे आदेशपारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात आला.

२. प्रतिवादी यांनी वाद मिळकत गट क्र. ४३१ मौजे खंडाळा, ता. वैजापूर, ५ एकर ३७ गुंठे क्षेत्रा वरील वादीचे वहीवाटीस सदर दाव्याचा निकाल लागेपावेतो हरकत अडथळा करु नये.

३. खर्च मुळ दाव्यात समाविष्ठ करण्यात यावा.

Digitally signed by Pratibha Tushar Shejwal Kale
Date: 2021.03.30 13:27:06 +0530

दिनांक – २६.०३.२०२१ (श्रीमती प्र. तु. शेजवळ–काळे)
ठिकाण – वैजापूर. सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
वैजापूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | G.D.Ghule<br>Stenographer (Grade -3) |
| Court | : | Smt. P. T. Shejwal-Kale<br>Jt. Civil Judge S.D., Vaijapur. |
| Date of order | : | 26-03-2021. |
| Order signed by the presiding officer on | : | 26-03-2021. |
| Order uploaded on | : | 30-03-2021. |